विक्री खत

मौजे चोपडा शिवारातील शहर नगरपालिका हद्दीतील बखळ प्लॉट जागेचे किंमत रुपये –
————————/– रुपये ————————————————————मात्र वर दिनांक
– / /२०१७

१) ————————————————
वय– ——, धंदा – लिहून घेणार
पत्ता– ———————————— ,
`————————————————

१) परिस लॅन्ड डीलर्स ॲण्ड डेव्हलपर्स चे प्रोप्रायटर
अनिल सुभान पाटील
वय– ४७ , धंदा –व्यापार व शेती लिहून देणार
पत्ता – प्लॉट नं ३ , एमजे कॉलेज जवळ,
जळगाव ता व जि जळगाव

कारणे विक्री खत लिहून देत आहोत की ,

लिहुन देणार यांचे संपुर्ण मालकीची कबजे उपभोगातील खालील वर्णन केलेली मिळकत बखळ प्लॉटस जागा लिहुन देणार हे लिहुन घेणार यांना रक्कम रुपये ———————————— अक्षरी रुपये ———————————————————————————— मात्र वर कायम मालकी हक्काने , व कबजे वहिवाटीत देत आहे त्या मिळकती चे वर्णन :

तुकडी जिल्हा जळगाव पोट तुकडी तालुका चोपडा पैकी शहर चोपडा नगरपालिका हद्दीतील मौजे चोपडा

शिवारातील गट नंबर — ११३५ चा भागा पैकी या मिळकतीत अभिन्यासास तापुरती मंजुरी सहय्यक संचालक नगररचना जळगाव यांचेकडिल पत्र क्रमांक १९४७ दिनांक २८/७/२०१६ रोजी शिफारस केलेली आहे व चोपडा नगरपरिषद यांचेकडील पत्र क्रमान्क १३१६ दिनांक २०/७/१७ रोजी तहसिलदार सो चोपडा यांचे कडे रहिवासकामी बिनशेती सारा भरणेकामी पत्र दिलेले असून सदर अभिन्यास उपाधिक्षक भूमी अभिलेख चोपडा जि. जळगाव यांनी त्यांचे कडिल पत्र क्रमांक /तातडी/ बिशे/मो र नं— /२०१७ अन्वये मोजणि नकाशा दिलेला आहे, त्या अनुसार ७/१२ उतारे वेगवेगळे केलेले आहेत. व त्यातील अटी व शर्तीनुसार सदर मिळकतीवरील अभिन्यासात दर्शविलेले रस्ते, आर. सी. सी. गटारी व विजेचे खांब व स्ट्रीट लाईट सह लिहुन देणार यांनी त्यांचे स्वखर्चाने उभारल्यानंतर सदर अभिन्यासास चोपडा शहर नगरपरिसषद यांनी तपासणि करून त्यास अंतीम मंजुरी पत्रक्रमांक संदर्भ क्रमांक नप /न.र/०००० दिनांक ००/००/२०१७ रोजी दिलेली आहे .सदर अभिन्यासात एकुण १ ते २६ प्लॉटस आहेत त्याबाबतचे क्षेत्रफळ सदर अंतिम अभिन्यासात नमुद केलेले आहे. चोपडा शहर नपाचे अंतिम परवानगीनंतर सदर प्लॉटस जागा विक्री करण्यास योग्य आहे . त्या मिळकतीचे विस्तृत **वर्णन खालील प्रमाणे —**

कलम क्रमांक १— मौजे चोपडा **गट नं —११३५ पैकी या रहिवासकामी बिनशेती अभिन्यासातील १ते २६ प्लॉट्स पैकी —**

प्लॉट क्रं	**चौरस**	**पुर्वबाजू**	**पश्चिमबाजू**	**उत्तरबाजू**	**दक्षिणबाजू**	.
	मीटर	**रस्ता**	**मीटर**	**मीटर**	**मीटर**	
००	०००	००	००	००	००	

एकुण क्षेत्रफळ ००० चौरस मीटर

या संपुर्ण प्लॉट्स ची चतु:सीमा अभिन्यासात दाखविल्या प्रमाणे आहे .

येणे प्रमाणे चतु:सीमेचे आतील बखळ प्लॉट जागा जमिन , जागा , दगड , मातीसुध्दा आतील सर्व प्रकारचे झाड झुडुपासह, तसेच ज्या परिस्थितीत आहे त्या सह तदंग भुत वस्तुंसुध्दा सदर शेत जमिनीत

लिहुन देणार यांनी चोपडा शहर महानगरपालिके कडे तात्पुरता अभिन्यास मंजुर केल्यानंतर जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय यांचे कडे रहिवास कामी बिनशेती आदेश मिळणे कामी सर्व पुर्तता केलेली असून त्या अन्वये अभिन्यास तयार करुन मंजुरी घेतलेली आहे व प्लॉटची मोजणि करून खुणा गाडलेल्या आहेत. सदर मिळकतीवरील अभिन्यासात दर्शविलेले रस्ते, आर. सी. सी. गटारी व विजेचे खांब व स्ट्रीट लाईट सह लिहुन देणार यांनी त्यांचे स्वखर्चाने उभारले आहेत आज रोजी खडीकरणााचे रस्ते तयार केलेले असून त्यावरुन जाणे येणेचा मुख्य वापर आहे त्या सुध्दा, लिहून देणार हे लिहून घेणार यांना वरील रकमेच्या मोबद्ल्यात कायम मालकी हक्काने विक्री देऊन आज रोजी लिहुन घेणार यांचे प्रत्यक्ष कबजात खालील साक्षीदारां समक्ष दिली आहे.

सदर शेतजमिन दुय्यम निबंधक चोपडा यांचेकडे दस्त अनुक्रम क्रमांक २८८० – दि २१/०८/२००८ अन्वये श्रीनारायण पंडीत बोरोले व इतर ७ यांचे कडुन खरेदीखत लिहुन देणार यांचे लाभात नोंदणीकृत झालेले आहे.

सदर मिळकत लिहुन देणाार यांचे नावाची कबजेदार व मालक म्हणुन अभिलेखात नोंद झालेली आहे

.

.सदर मिळकती पोटी ठरलेल्या रकमेचा मोबदला लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना अदा केल्याने लिहुन घेणार यांना सदर मिळकती बाबतचे मालकी हक्क या विक्री खताने प्राप्त झालेले आहे सदर मिळकतीवर लिहून देणार यांचे वारसदारांचा तसेच कोणत्याही भागीदारी संस्थेचा वा अन्य कोणचाही हितसंबंध राहिलेला नाही. लिहून घेणार यांनी सदर शेतमिळकतीचा त्यांचे मर्ज़ी नुरूप विनीयोग व उपभोग करावा़ सदर मिळकत लिहुन देणार यांनी अन्य कोणत्याही ठीकाणी गहाण , विक्री , करारनाम्यात, बक्षीस, जप्तीत , जामिनकीत अडकवीलेली नाही. .

वरील कलम एक मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीची लिहून घेणार यांना कायम मालकी हक्काने विक्री केल्यामुळे आपसातील ठरलेल्या किंमतीचा मोबदला रकमेचा भरणा लिहुन घेणार यांचे कडुन लिहुन देणार यांना मिळाला आहे , त्याबद्दलचा भरण्याचा तपशील –

पये – ०००००० /– रुपये ———————————————— मात्र चा भरणा माझे कडे सदर रक्कम खरेदीखतात मोबदला रक्कम म्हणुन भरणा केलेली आहे .

————————————

रुपये – ०००००० /– रुपये ———————————————— मात्र चा **भरणा लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांना वर्ग केला** असुन त्या रकमेचा भरणा लिहुन देणार यांना प्राप्त झाला आहे .त्याबद्दलची कोणतीही तक्रार राहीलेली नाही.

अटी व शर्ती :

१) सदर मिळकती संबंधाने सरकारी सर्व शर्ती लिहुन घेणार यांचेवर बंधकारक राहतील. त्या लिहुन घेणार यांनी मालक म्हणुन पाळाव्यात ती जबाबदारी तुमचेवर आहे.

२) सदर मिळकती संबंधाने आजपावेतोचा शेतसारा, लोकलफ़ंड, ठेंगेकर, लेव्ही बंडीग वगैरे शेती विषयीक सर्व प्रकारचे कर तसेच सरकारी अथवा निमसरकारी कर तसेच बिनशेती सारा आज पर्यंतचे भरण्याची जबाबदारी लिहून देणारावर आहे

३) सदर मिळकती संबंधाने ७/१२ चा उतारा, खाते उतारा, हक्क पत्राच्या नोंदी, लिहुन देणार यांनी लिहून घेणार यांना दिले आहेत.

४) सदर मिळकती शेतजमीन कायम मालकी हक्काने ख्ररेदी दिली आहे. तेव्हा लिहुन घेणार यांचे नांव ७/१२ चे दप्तरी लागणेसाठी लिहुन देणार यांनी जरुर त्या सर्व कागदपत्रांवर सह्या दिल्या आहेत. व भविष्यात लागल्यास त्या सहया विनामुल्य व विना विलंब देण्याची हमी लिहुन देणार यांनी घेतली आहे.

५) सदर मिळकत हस्तांतर करणे कामी विक्रीखता साठी लागणारा मुद्रांक व नोंदणी खर्च लिहून घेणार यांनी केला आहे

६) सदरचे विक्री खत लिहुन देणार यांचे वर व त्यांचे वारसांवर बधंनकारक आहे व राहील.

हे विक्री खत लिहून देणार यांनी लिहुन घेणार यांना राजिखुशीने व स्वसंतोषाने खालील साक्षीदारांसमक्ष

लिहून नोंदणीकृत करुन दिले आहे

लिहून देणार **सही**

१) परिस लॅन्ड डीलर्स अॅण्ड डेव्ह्लपर्स चे

प्रोप्रायटर अनिल सुभान पाटील ——————————

लिहून घेणार

) ——————————— ——————————

साक्षीदार

१——————————— २———————————

———————————————

———————————————

———————————————